# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – १४४९/२०२२/जळगांव**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नागसेन राजाराम सुरळकर<br>रा. मु. पो. नाडगांव, ता. बोदवड,<br>जि. जळगांव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>नगर अभियंता,<br>नगरपंचायत कार्यालय, बोदवड,<br>ता. बोदवड, जि. जळगांव. | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>मुख्याधिकारी,<br>नगरपंचायत कार्यालय, बोदवड,<br>ता. बोदवड, जि. जळगांव. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – १२/०१/२०२३**

अपिलार्थी यांनी दि. ०९/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी अर्जात नमुद असलेली माहिती मुद्द्यातील न दिल्याने, मुद्दा क्र. १ ते ६ ची मागीतलेली माहितीची सत्यता पडताळता न आल्याने संबंधी माहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१२/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे प्रतिनिधी

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** अपिलार्थी

अपिलार्थी यांनी दि.१७/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०१६ ते सन २०२१ या कालावधीतील नगरपंचायत कार्यालय बोदवड अंतर्गत केलेल्या ई-निवीदा कामांची व त्यांच्या कागदपत्रांची माहिती १.नगरपंचायत बोदवड अंतर्गत कामे मंजूर करण्यासाठी असलेल्या निकष/शासन परिपत्रक/अटी व शर्ती च्या कागदपत्रांच्या माहितीच्या छायांकित प्रती, २. नगरपंचायत बोदवड अंतर्गत सन २०१६ ते सन २०२१ पर्यंतच्या कालावधीतील केलेल्या कामांच्या कार्यारंभ आदेशांच्या माहितीच्या छायांकित प्रती तसेच त्यांच्यावर आपल्या कार्यालयाकडुन आजपर्यंत करण्यात आलेल्या कारवाईच्या माहितीच्या छायांकित प्रती, ३. आपल्या नगरपंचायत बोदवड अंतर्गत देण्यात आलेल्या ई-निवीदाच्या दैनंदिन पेपर मध्ये देण्यात आलेले जाहिरातीच्या छायांकित प्रती, ४.सन २०१६ ते सन २०२१ पर्यंतच्या

कालावधीतील केलेल्या कामांच्या यादी व कामांच्या मंजूर रक्कमे सह माहितीच्या छायांकित प्रती, ५. ज्या ठेकेदारांना ई-निवीदाची कामे मंजुर करण्यात आले त्या ठेकेदारांची नावे व त्यांनी ई-निवीदा करते वेळी सोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मिळण्यात यावी, ती कामे तेच ठेकेदार करत असल्या बाबतचा पुरावाच्या माहितीच्या छायांकित प्रती, ६. मजूरांची आधार नोंदणी तसेच पीटी क्लीरेन्स सर्टीफीकेट व मजूरांचा इपीएफ आणि इनशूरन्स तसेच ते मजूर नोंदणी केलेले आहे. तेच मजूर हयात असल्याबाबतच्या तपासणी अहवालाच्या माहितीच्या छायांकित प्रती याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना विहीत मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसुन येत नाही.

तद्नंतर कोणतेही उत्तर न मिळाल्याने अपिलार्थी यांनी दि. २३/०९/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केला नाही. प्रथम अपिलीय अधिकारी, तथा मुख्याधिकारी यांनी दि. १७/११/२०२२ रोजीच्या प्रथम अपिल सुनावणी बाबत नोटीस पाठविली होती.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झाला होता. मात्र सदर कालावधीत दिनांक ३०/०८/२०२१ रोजी बदली बोदवड नगरपंचायत येथून भुसावळ नगरपरिषद भुसावळ येथे झाल्याने माहिती पुरविता आली नाही. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या तर्फे प्रतीनिधीयांच्या कडे कोणते ही, अभिलेख नसल्याने त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल सुनावणी घेतली किंवा कसे याबाबत काही नमुद करता आले नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १७/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

या प्रकरणातील प्रथम अपील अर्जाच्या दिनांकास कार्यरत प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपंचायत कार्यालय, बोदवड हे द्वितीय अपील सुनावणीच्यावेळी गैरहजर होते. त्यांच्या तर्फे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र त्यांच्या कडे कोणते ही अभिलेख उपलब्ध नसुन त्यांनी आयोगास कोणताही पुरावा सादर केला नाही. तसेच त्यांनी त्यांचे लेखी म्हणने देखील आयोगास सादर केलेले नाही अपिलार्थी यांच्या दिनांक २३/०९/२०२१ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीनी देखील द्वितीय अपील अर्जात प्रथम अपील अर्जाची सुनावणी दिलेली नाही, असे नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५

च्या कलम १९(६) आणि शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र. केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील नमुद तरतुदींनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केली किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. तरी याबाबत जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जळगांव यांनी उपरोक्त प्रथम अपिलासंदर्भात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केली किंवा कसे याबाबत खातरजमा करुन तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही करावी असे आदेश देणे आवश्यक आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगरपंचायत कार्यालय, ता. बोदवड, जि. जळगांव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगरपंचायत कार्यालय, ता. बोदवड, जि. जळगांव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) जिल्हाधिकारी, जळगांव यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणातील प्रथम अपील अर्जाच्या दिनांकास कार्यरत प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपंचायत कार्यालय, ता. बोदवड, जि. जळगांव यांनी वर नमूद केलेल्या निरीक्षणांच्या आधारे अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र. केंमाअर्ज-२००७/७४/ प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १४४९/२०२२/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जळगांव, ता.जि. जळगांव.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री. आकाश अविनाश डोइफोडे (तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी) तथा मुख्याधिकारी, नगरपंचायत कार्यालय, ता. बोदवड, जि. जळगांव.

३) श्री. रितेश भाऊसाहेब बच्छाव (तत्कालीन जन माहिती अधिकारी) तथा नगर अभियंता, नगरपंचायत कार्यालय, ता. बोदवड, जि. जळगांव.

---

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./१४४९/२०२२/जळगांव ओ-** 122 **दिनांक-** 03/07/2023

---

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक